मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपचे माजी शहराध्यक्ष आणि प्रवक्ते एकनाथ पवार यांचा ठाकरे गटात प्रवेश!

## एकनाथ पवारांनी बांधलं शिवबंधन



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवडमध्ये भाजपला झटका बसला आहे. कारण भाजपचे माजी शहराध्यक्ष आणि प्रवक्ते राहिलेले एकनाथ पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. बुधवारी दुपारी मुंबईत मातोश्री या ठाकरेंच्या निवासस्थानी हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी उद्धव ठाकरेंनी त्यांच्या मनगटावर शिवबंधन बांधलं.

पिंपरी- चिंचवडमध्ये भाजपच्या प्रमुखपदावर काम करण्याची मोठी जबाबदारी एकनाथ पवार यांच्या खांद्यावर होती. त्यांचं मूळ गाव हे नांदेडमधील लोहा हे आहे. त्यामुळं त्यांचा त्या भागातही चांगला संपर्क आहे. पण पक्षांतर्गत राजकारण आणि संघटनेत डावललं जात असल्याची भावना असल्यानं ते नाराज होते. त्यामुळं त्यांनी नुकतीच खासदार संजय राऊत यांची भेट घेतली होती, त्याचवेळी ते ठाकरे गटात प्रवेश करणार असल्याचं स्पष्ट झालं होतं. आपल्याकडं काहीही नसताना एकनाथ पवार यांनी आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला. त्यामुळं मी त्यांचं शिवसेनेत स्वागतच करतो. आता त्यांनी नांदेड आणि पिंपरी-चिंचवडमध्ये काम करावं, अशी अपेक्षा व्यक्त करताना त्यांच्यावर संघटकपदाची जबाबदार देण्यात आली आहे.

### नांदेडमध्येही चांगला जनसंपर्क

» नांदेडचे भाजपचे खासदार प्रताप चिखलीकर यांच्याविरोधात एकनाथ पवार यांना उद्धव ठाकरे गटाकडून उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. आपल्याला लोहा कंधारच्या विकासासाठी काम करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यामुळं इथून विधानसभेची उमेदवारीही त्यांना दिली जाऊ शकते. दरम्यान,एकनाथ पवार यांच्यासह युवा मोर्चाचे चेतन पवार यांनी देखील आपल्या सहकाऱ्यांसह ठाकरे गटात प्रवेश केला आहे.

# झेंडूच्या दरात मोठी घसरण ; झेंडू फेकताना शेतकऱ्याचे अश्रू अनावर

## झेंडू घेणाऱ्या व्यापाऱ्यांनाही करावा लागला नुकसानीचा सामना

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मागणीपेक्षा कितीतरी पटीने अधिक आवक झाल्याने झेंडूच्या दरात मोठी घसरण झाली. त्यामुळे दूरवरून झेंडूची विक्री करण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फेरले गेले. अतिशय कष्टाने पिकवलेली फुले रस्त्यावरच टाकून देताना अनेक शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले होते. चढ्या दराने विक्रीसाठी झेंडू घेणाऱ्या व्यापाऱ्यांनाही मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला. दसऱ्याला पूजेसाठी झेंडूच्या फुलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. किरकोळ व्यापाऱ्यांबरोबर राजगुरुनगर, मंचर, जामखेड, नगर, संगमनेर, पारनेर परिसरातील शेतकरी दोन पैसे जास्त मिळतील, या आशेने आपल्या शेतातील फुले पुणे-पिंपरी चिंचवड परिसरात आणून किरकोळ व्यापाऱ्यांना विकतात तसेच स्वतः ही चौका- चौकात थांबून विक्री करतात. मंगळवारी दसरा असल्याने दोन दिवस अगोदरच शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील



फुले बाजारात विक्रीसाठी आणली होती. अतिशय कमी दरात म्हणजे वीस किलो फुलांचे पोते ८० ते १०० रुपये या दराने विकले गेले. सोमवारी आठ ते दहा रुपये किलो प्रमाणे दर मिळाला. मात्र, मंगळवारी मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने फुलांना दर मिळणे आणि विक्री होणे अशक्य असल्याचे लक्षात येताच किरकोळ व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडील फुले खरेदी करण्यास नकार दिला. त्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच फुलांची विक्री करणे भाग पडले. दोन ते पाच रुपये किलो या दराने विक्री करूनही फुलांची विक्री झाली नाही. शेवटी अनेक शेतकऱ्यांना टेम्पोतील फुले रस्त्याच्या कडेला सोडून घरचा रस्ता धरावा लागला. दर्जेदार फुलांची उत्पादन घेण्यासाठी लाखो रुपये खर्च करून सुद्धा टेम्पो भाडे निघत नसल्याने अनेक तरुण शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले होते. याबाबत खर्डा (ता. जामखेड) येथील शेतकरी सुभाष देवकते म्हणाले, ''भुसार मालाची शेती परवडत नसल्याने फुलांची शेती करण्याचे ठरवले. जुलैमध्ये झेंडूची रोपे घेऊन लागवड केली. मात्र, पावसाने दडी मारल्याने टँकरने पाणी घातले. अडीच एकर झेंडूच्या शेतीला दीड लाख रुपये खर्च आला. फुले चांगली आल्याने किमान पाच लाख रुपये मिळतील, अशी अपेक्षा होती. सहा टेम्पो फुले घेऊन पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात आलो होतो. मात्र, यावर्षी फुलाला दर न मिळाल्याने शेतीचा खर्च सोडा टेम्पोचे भाडेही घरातून द्यावे लागणार आहे.

# चिखलीसह समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा सक्षम!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा सकारात्मक पाठपुरावा

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

समाविष्ट गावांच्या विकासाचा मुद्दा हातात घेवून आम्ही विकासकामांना गती देण्याची भूमिका घेतली आहे. नवीन पाणी उपसा पंपामुळे चिखली व परिसरातील पाणी पुरवठा सक्षम होणार आहे. समाविष्ट गावांतील पाणी प्रश्न सोडवण्यास आम्हाला यश मिळाले आहे, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

चिखली आणि परिसरातील सुमारे ९० हजार नागरिकांच्या पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून थेट पाईपद्वारे पाटीलनगर येथील जलकुंभात पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र पंप बसवण्यात आला आहे. त्याचे लोकार्पण आमदार लांडगे व समस्थ ग्रामस्थ चिखली यांच्या हस्ते



करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेवक सुरेश म्हेत्रे, कुंदन गायकवाड, सुरेश लोखंडे, दिनेश यादव, विनायक आबा मोरे, अंकुश मळेकर, अमृत सोनवणे, यशवंत साने, पांडाभाऊ साने, निलेश नेवाळे, किसन बावकर, प्रदीप आहेर, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, जितेंद्र यादव, दिनेश लोखंडे, नवीन बग, संदीप शेलार, संतोष जाधव, गणेश भुजबळ, अविनाश मोरे, संदीप नेवाळे, तुकाराम जाधव, सदाशिव नेवाळे, कार्यकारी अभियंता रामनाथ टकले, मिलन दौंदर, अभियंता रमेश जिंतीकर आदी उपस्थित होते. माजी महापौर राहुल जाधव म्हणाले की, समाविष्ट गावे विकासापासून वंचित होते. मात्र, २०१४ मध्ये आमदार महेश लांडगे यांनी निवडून आल्यानंतर समाविष्ट गावांच्या विकास विकासाला चालना मिळाली. २०१७ मध्ये 'व्हीजन-२०२०' अंतर्गत समाविष्ट गावांसाठी पाणी पुरवठा सक्षम करण्यासाठी २०१७-१८ मध्ये आंद्रा पाणी प्रकल्पाला गती देण्यात आली. या प्रकल्पातील पाणी चिखलीला मिळणार नाही, अशी दिशाभूल करण्याचा प्रयत्न काहींनी केला. मात्र, या प्रकल्पाच्या 'जीआर'मध्येच चिखलीसह समाविष्ट गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत उल्लेख आहे. नवीन पंपाच्या माध्यमातून केवळ चिखली व आजुबाजुच्या वाड्या वस्त्यांना पाणीपुरवठा होणार आहे. चिखली-मोशी-चऱ्होली हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, चिखली येथील

> आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाला मंजुरी देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे झपाट्याने विकसित होणाऱ्या समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवडचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होणार आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आम्ही शहराच्या पाणी प्रश्नाबाबत वेळोवेळी विधानसभा सभागृहात शहराची भूमिका मांडली. चिखली जलशुद्धीकरण केंद्रातील नव्याने सुरू केलेल्या पंपाच्या माध्यमातून चिखली आणि परिसरात पाणी पुरवठा सुरळीत होईल. आगामी काळात शहरातील पाणी पुरवठा सक्षमीकरणासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

जलशुद्धीकरण केंद्रातील नवीन पंपामुळे चिखली आणि सभोवतालच्या परिसराचा पाणीपुरवठा सक्षम होणार आहे. त्यामुळे सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे. गेल्या आठ-दहा वर्षांपासून महापालिका प्रशासनाच्या हद्दीतील विकसक गृहप्रकल्प उभारणारे विकसक महापालिका प्रशासनाला हमीपत्र लिहून देत आहेत. त्यामध्ये आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पातून पाणी पुरवठा सुरू होईपर्यंत विकसक सोसायटीधारकांना पाणी पुरवठा करतील, असा उल्लेख आहे. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने झाली. नवीन पंपामुळे चिखली परिसरातील सर्व सोसायटीधारकांना पाणी पुरवठा सुरळीत होणार असून, समाधानाचे वातावरण आहे.

# श्री संत सावता प्रतिष्ठानकडून कर्तृत्ववानांचा सन्मान!

## नवरात्रोत्सवानिमित्त विविध उपक्रम साजरे

**मोशी।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

श्री संत सावता प्रतिष्ठान मागील १६ वर्षापासून नवरात्रोत्सव मोठ्या जल्लोषात साजरे करते. विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नवदुर्गांचा तसेच कर्तृत्ववानांचा सन्मान याठिकाणी केला जातो. प्रतिष्ठानकडून सादर केलेला केदारनाथ मंदीर देखावा हा मुख्य आकर्षण होते. दरवर्षी या परिसरातील प्रतिष्ठानकडून भव्यदिव्य नवरात्रोत्सव साजरा केला जातो. यावर्षी उत्साही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभाला.

प्रतिष्ठाणच्या माध्यमातून




आकर्षक विद्युत रोषणाई, पारंपारिक ढोल ताशा पथक, फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. प्रथमतः भव्य मिरवणूक करण्यात आली. दरवर्षी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांचा सन्मान प्रतिष्ठानच्या माध्यमातून केला जातो. यंदा ही पोलिस, सफाई कर्मचारी, भारतीय सैनिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार महेश दादा यांच्या हस्ते आरती आणि सन्मान करण्यात आला. परिसरातील चार ते पाच हजार नागरिक दररोज नवरात्रोत्सवातील विविध उपक्रमांमध्ये दांडिया, गरबामध्ये सहभागी झाले.

मागील सोळा वर्षापसन श्री संत सावता प्रतिष्ठनच्या माध्यमातून नवरात्रोत्सव भव्यदिव्य साजरा केला जातो. यामध्ये गरबा, दांडिया सोबतच विविध क्षेत्रातील कर्तत्ववांनाचा सन्मान केला जातो. स्त्रियांचा सन्मान होणे आवश्यक आहे. दुर्गामाताची नऊ रूपे ही स्त्रियांचीच आहेत. त्यांचा उत्सव करताना स्त्रियांच्या कर्तत्वाचा सन्मान आवश्यक असतो. त्यासाठी प्रतिष्ठान हा सन्मान करतो. मोठ्या प्रमाणात मिरवणूक काढली जाते. या मिरवणूकीत हजारो भाविक सहभागी होतात, अशी माहिती प्रतिष्ठानचे आयोजक मंगेश हिंगणे यांनी दिली.

# जुन्नरमध्ये शरद पवारांची एन्ट्री!

## सत्यशील शेरकर राष्ट्रवादीत प्रवेश करणार?



### शरद पवार जुन्नर दौऱ्यावर

» २ नोव्हेंबरला शरद पवार हे जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरु होत आहे. त्यानिमित्ताने शरद पवार यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे. विघ्नहरच्या गळीत हंगामाचं निमित्त करून पुन्हा पवार-शेरकर यांची भेट होत असल्याने तालुक्याच्या राजकारणात मोठा उलटफेर होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत आहेत. शरद पवार यांना शेतकऱ्यांची जाण असणारे नेते म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून ते नेहमीच रोखठोक भूमिका घेत असतात. कृषिमंत्री असताना केलेली दैदीप्यमान कामगिरी लाखो शेतकऱ्यांच्या लक्षात आहे. त्याच पार्श्वभूमीवर २ नोव्हेंबरला शरद पवार विघ्नहर कारखान्यावर येणार असल्याने राजकीय वातावरण बदलू लागले आहे.

पुणे।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाला. त्यानंतर शरद पवार आणि अजित पवार हे दोन गट पडले. अजित पवार यांच्यासोबत बहुसंख्य आमदार गेल्यानंतर ८३ वर्षीय शरद पवार पुन्हा मैदानात उतरले असून पक्ष बांधणीसाठी त्यांनी दौरे सुरू केले आहेत. काही दिवसांपूर्वी शरद पवार हे जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर होते. त्या दौऱ्यात विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा सत्यशील शेरकर यांच्या घरचा पाहुणचार स्वीकारून पवारांनी त्यांच्याशी 'विशेष हितगुज' केलं. त्यानंतर सत्यशील शेरकर हे शरद पवार गटात जाणार असल्याच्या जोरदार चर्चा रंगल्या. त्यात जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांना सत्यशील शेरकर पर्याय होऊ शकतात, अशी शक्यता देखील वर्तवली जात होती. मात्र अतुल बेनके आणि सत्यशील शेरकर एकच असल्याचे सांगून त्यांनी चर्चेवर पडदा टाकला होता. मात्र आता पुन्हा एकदा शरद पवार आणि सत्यशील शेरकर यांची भेट होणार असल्याने ते राष्ट्रवादीत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी जोर धरलाय. येत्या २ नोव्हेंबरला शरद पवार हे जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू होत आहे. त्यानिमित्ताने शरद पवार यांच्या हस्ते गळीत हंगामाचा शुभारंभ होणार आहे. विघ्नहरच्या गळीत हंगामाचं निमित्त करून पुन्हा पवार-शेरकर यांची भेट होत असल्याने तालुक्याच्या राजकारणात मोठा उलटफेर होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात होत आहेत. शरद पवार यांना शेतकऱ्यांची जाण असणारे नेते म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून ते नेहमीच रोखठोक भूमिका घेत असतात. कृषिमंत्री असताना केलेली दैदीप्यमान कामगिरी लाखो शेतकऱ्यांच्या लक्षात आहे. त्याच पार्श्वभूमीवर २ नोव्हेंबरला शरद पवार विघ्नहर कारखान्यावर येणार असल्याने राजकीय वातावरण बदलू लागले आहे. शरद पवार हे जुन्नरसाठी नव्या उमेदवाराची चाचपणी तर करत नाहीत ना? अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. याबाबत विघ्नहर कारखान्याचे संचालक सत्यशील शेरकर यांनी 'मटा ऑनलाइन'सोबत बोलताना सांगितले की, ''शरद पवार हे विघ्नहर कारखान्याच्या गळीत हंगामासाठी येणार आहेत. पवारसाहेब हे शेतकऱ्यांची जाण असलेले नेते आहेत. ते जुन्नरमध्ये येत असले आणि माझ्या प्रवेशाबाबत चर्चा होत असली तरी सध्या याबाबत मी विचार केलेला नाहीये''.

# पुणे-मुंबई एक्सप्रेस वे'वर विशेष ब्लॉक!

## मुंबईकडे जाणारी वाहतूक १ तासासाठी बंद



### या वेळेत प्रवास करणे टाळावे

» काम पुर्ण झाल्यावर दुपारी १ वाजता सदर वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल, असेही कळविण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये - जा करत असतात. उद्या एक तासाचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार असून प्रवाशी नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या वेळेत प्रवास करणे टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे.

पुणे।
न्यूज एक्स्प्रेस मराठी।
द्रुतगती महामार्गावर मुंबईच्या दिशेने बोरघाट हद्दीत किमी ४४/८०० आणि किमी ३७/८०० या ठिकाणी ग्रांटी बसविण्यासाठी उद्या (दि.२६) रोजी १२ ते १ असा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे या कालावधीत मुंबईकडील सर्व वाहतूक बंद करण्यात येणार आहे. तसेच अवजड वाहतूक उर्से टोलनाक्यावर थांबवण्यात येणार आहे.

फक्त कार साठी किमी ५५ लोणावळा एक्झीट येथून जुना पुणे मुंबई महामार्ग - अंडा पॉईंट - द्रुतगती महामार्ग - खोपोली शळीं - इंदिरा चौक खोपोली मार्गे वाहतूक सुरू राहणार आहे. काम पुर्ण झाल्यावर दुपारी १ वाजता सदर वाहिनीवरील वाहतूक पुन्हा सुरु करण्यात येईल, असेही कळविण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये - जा करत असतात. उद्या एक तासाचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार असून प्रवाशी नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी या वेळेत प्रवास करणे टाळावे असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे या वेळेत महामार्गावरून प्रवास करणं टाळावे असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून द्रुतगती महामार्गावर विशेष ब्लॉक घेतला जात आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. ग्रँटी उभारण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. त्या दृष्टिकोनातून हे ब्लॉक घेतले जात असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. उद्याचा ब्लॉक हा मुंबईच्या दिशेची वाहतूक बंद करण्यात येणार असून यावेळेत प्रवास न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# स्कूलबस, व्हॅनचे आयुर्मान पाच वर्षांनी वाढविण्याची मागणी!

## वाहनांचे आयुर्मान १५ ऐवजी २० वर्ष करावे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कोरोना काळात शाळांना सुट्टी असल्यामुळे विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी वाहने थांबून होती. त्यांचे नुकसान होऊन आयुर्मान वाढले आहे. वाहतूकदारांचे नुकसान भरून काढण्यासाठी परिवहन विभागाने स्कूल बस, व्हॅन यांना दोन वर्षांसह आणखी तीन वर्षे असे एकूण पाच वर्षांचे आयुर्मान वाढवून द्यावे, अशी मागणी विद्यार्थी वाहतूकदारांनी केली आहे. परिवहन विभागाने ऑल इंडिया परमीट सहस्कूल बस परमिट असणाऱ्या वाहनांचे आयुर्मान निश्चित



केले आहे. यात वाहनांना १५ वर्षांची मर्यादा घातली आहे. १५ वर्षांनंतर या परमीटअंतर्गत वाहनातून प्रवासी अथवा विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यास बंदी घातली आहे. विद्यार्थी वाहतुकीसाठी शाळेसोबतचा करारपत्र व आरटीओचे परमिट आवश्यक आहे. परमिट हे पाच वर्षांसाठी दिले जाते. परिवहन विभागाने कोरोना काळातील दोन वर्षांचा विचार करून त्या दोन वर्षांसह आणखी तीन वर्षे, असे मिळून एकूण पाच वर्षे वाढवून द्यावीत, अशी मागणी वाहतूकदारांनी केली आहे. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षा अथवा व्हॅनचालकांची आर्थिक स्थिती नाजूक आहे. वाहतुकीचे दर

> “परिवहन विभागाने अन्य वाहनांप्रमाणे विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे आयुर्मान १५ ऐवजी २० वर्ष इतके करावे. कोरोना काळात वाहतूकदारांचे नुकसान झाले आहे. आयुर्मान वाढविल्यास वाहतूकदारांना काहीसा दिलासा मिळणार आहे.
>
> **- बापू भावे, रिक्षा फेडरेशन, खजिनदार, पुणे.**

वाढविल्यास पालकांचा रोष पत्करावा लागतो. त्यामुळे त्यांना नुकसान सहन करीत हा व्यवसाय करावा लागतो. त्यात एका शाळासमवेत करार झाल्यानंतर त्या चालकास दुसऱ्या शाळेच्या विद्यार्थ्यांची वाहतूक करता येत नाही. त्यामुळे वाहतूकदारांची मोठी आर्थिक कोंडी होते. तेव्हा वाहतूकदारांना एकाच वेळी किमान तीन शाळेशी करार करून विद्यार्थी वाहतूक करण्यास परवानगी मिळावी, अशीही मागणी वाहतूकदारांकडून होत आहे.

# मराठा आरक्षण : जिल्ह्यात राजकीय नेत्यांना बंदी!

## २८ तारखेला कॅन्डल मार्च काढण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील हे उपोषणाला बसले आहेत. त्या पार्श्वभूमीवर पुण्यात साखळी उपोषण सुरू करण्यात येत असून या सर्व घडामोडी लक्षात घेऊन पुणे जिल्ह्यात राजकीय नेत्यांना बंदी घालण्याचा निर्णय मराठा क्रांती समन्वयकांच्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे, अशी माहिती मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक राजेंद्र कुंजीर यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. तर २८ तारखेला



शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून डेक्कन येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत कॅन्डल मार्च काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राजेंद्र कुंजीर म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला ४० दिवसांची मुदत दिली होती. ती मुदत सरकारने पाळली नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील आता पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. त्या सर्व घडामोडी दरम्यान पुण्यातील मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक पुणे स्टेशन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या समोरील बाजूस साखळी उपोषणाला बसले आहेत. तसेच राज्यातील अनेक गावांमध्ये राजकीय नेतेमंडळींना येण्यास बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर पुणे शहर आणि जिल्ह्यात देखील राजकीय नेत्यांना बंदी घालण्याचा निर्णय मराठा क्रांती मोर्चा मार्फत घेण्यात आला आहे. ज्या ठिकाणी राजकीय नेत्यांचे कार्यक्रम आणि बैठका असतील, त्या ठिकाणी आम्ही काळे झेंडे दाखविणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला. तसेच ते पुढे म्हणाले की, २८ तारखेला सायंकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून डेक्कन येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत कॅन्डल मार्च काढण्यात येणार आहे. तसेच आम्हाला आजपर्यंत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्य सरकारने केवळ तारखा दिल्या आहेत. पण निर्णय काही घेतले नाही. त्यामुळे आम्ही आता मागे हटणार नसल्याची भूमिका यावेळी त्यांनी मांडली आहे.